**तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे**
**४१२ - ई, शिवाजी नगर, बहिरट पाटील चौक, पुणे ४११ ०१६**
**दूरध्वनी क्र.(०२०) २५६५६२३४** E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in

---

**(कालमर्यादा : ३०.०४.२०१९ )**

जा.क्र . विकापु/लले/गोप/वागोअ/२०१८-१९/ ५३
दिनांक :- ३०.३.२०१९

# परिपत्रक

विषय :- वार्षिक कार्यमूल्यमापन अहवाल २०१८ - २०१९ बाबत ...

संदर्भ :- १. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. सीएफआर १२१०/प्र.क्रं.४७/२०१०/तेरा दिनांक ०१/११/२०११

२. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. सीएफआर १२११/प्र.क्रं.२१७/२०१०/तेरा दिनांक १७/१२/२०११

३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएफआर १२११/प्र.क्र. २५७/तेरा दिनांक ०२.०२.२०१७

४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएफआर-१२११/प्र.क्र.२५७/तेरा दिनांक ०७.०२.२०१८

५. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांचे पत्र क्रमांक १(२) /तंशिसं/कार्यमूल्य.अहवाल/२०१८-१९/३७ दिनांक २७.०३.२०१९

या कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व अशासकीय अनुदानित संस्थाप्रमुखांना सूचित करण्यात येते की, दिनांक ३१.०३.२०१९ रोजी त्यांच्या संस्थेच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या सर्व शिक्षक व तृतीयश्रेणी कर्मचा-यांचे सन २०१८-१९ चे कार्यमूल्यमापन अहवाल लिहावयाचे आहेत. संस्थेतील सर्व शिक्षक व तृतीयश्रेणी क र्मचा-यांचे कार्यमूल्यमापन अहवाल तसेच चतुर्थश्रेणी कर्मचा-यांच्या कामाच्या मूल्यमापनार्थ टिपणे लिहून विहित कालमर्यादेत सादर करुन त्यांचे मूल्यमापन करुन घेण्याची जबाबदारी संस्थाप्रमुखांची आहे. त्यानुसार कार्यवाही न केल्याने भविष्यात काही प्रशासकीय अडचण निर्माण झाल्यास त्यास संबंधित संस्थाप्रमुख जबाबदार राहतील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

संस्थेतील सर्व शिक्षक, वर्ग ३ कर्मचारी व चतुर्थश्रेणी कर्मचा-यांचे कार्यमूल्यमापन अहवाल व टिपणे ही मागील वर्षाप्रमाणेच सुधारीत विवरणपत्रामध्ये (वर्ग ४ सोडून ) भरावयाची आहेत. कार्यमूल्यमापन अहवाल/टिपणे उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक १ सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मधील सूचनांप्रमाणे काटेकोरपणे अंमलबजावणी करुन योग्य पध्दतीने लिहावीत. संस्थेतील सर्व शिक्षक व तृतीयश्रेणी कर्मचा-यांचे सन २०१८-१९ चे (प्रतिवेदन कालावधी ०१.०४.२०१८ ते ३१.०३.२०१९ ) कार्यमूल्यमापन अहवाल तसेच चतुर्थश्रेणी कर्मचा-यांची टिपणे लिहून दिनांक ३०.०४.२०१९ पर्यंत निश्चितपणे या कार्यालयास सादर करण्यास सूचित करण्यात येत आहे. सर्वांचे कार्यमूल्यमापन अहवाल/टिपणे लिहून प्रत्येकी एका प्रतीत विहित कालमर्यादेत मूल्यमापनार्थ सादर करण्याची दक्षता घ्यावी.

संस्थेचे अध्यक्ष/सचिवांनी प्राचार्यांचा कार्यमूल्यमापन अहवाल लिहून व्दिप्रतीत स्वतंत्रपणे विहित कालावधीत या कार्यालयास मूल्यमापनार्थ सादर करावा.

( डॉ. दिलीप नंदनवार )
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे